**ठळक बातम्या**

- स्थलांतरित आणि परदेशी नागरिक विधेयक लोकसभेत मंजूर; बोगस पासपोर्ट किंवा विजा असणाऱ्यांना ७ वर्षाच्या कारावासाची तरतूद
- जिंदाल कंपनी राज्यात आणखी एक स्टील प्रकल्प उभारणार, ४२ हजार कोटींच्या गुंतवणुकीद्वारे आणि १५ हजारांहून रोजगारांची निर्मिती होणार
- नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर मधल्या सरकारी रुग्णालयांतल्या मृतांच्या वाढत्या संख्येप्रकरणी तज्ञ समिती नेमण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

**आणि**

- खेलो इंडिया पॅरा गेम्स स्पर्धेचा नवी दिल्लीत समारोप, ४३ पदकांसह महाराष्ट्र पाचव्या स्थानी

**<><><><><>**

व्यवसाय, शिक्षण, संशोधन, पर्यटन आणि आरोग्यासाठी देशात येणाऱ्यांचं स्वागत आहे. मात्र देशाला धोका निर्माण करू इच्छिणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिलं जाईल, असं स्पष्ट प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. लोकसभेत स्थलांतरित आणि परदेशी नागरिक विधेयकावरील चर्चेला ते उत्तर देत होते. हे विधेयक आज लोकसभेत मंजूर झालं. या विधेयकामुळे देशाची सुरक्षा मजबूत होईल, अर्थव्यवस्था आणि व्यवसायाला चालना मिळेल याशिवाय आरोग्य आणि शिक्षण क्षेत्राला चालना मिळेल असं ते म्हणाले. यामुळे भारतात येणाऱ्या प्रत्येक विदेशी व्यक्तीची तत्काळ माहिती

मिळेल, असंही त्यांनी सांगितलं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड - व्हाइस कास्ट....**

*स्थलांतरित आणि परदेशी नागरिक  विधेयक संविधान विरोधी असल्याचा आरोप काँग्रेसचे मनिष तिवारी यांनी चर्चेला सुरुवात करताना केला. यातल्या तरतुदींमुळे स्थलांतरितांच्या संदर्भात अधिकाऱ्यांना जादा अधिकार मिळणार असून त्यांच्याकडून त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे असं ते म्हणाले. सखोल तपासणासाठी हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावं अशी मागणी त्यांनी केली. पाहुण्यांचं स्वागत करणं ही भारताची संस्कृती आहे पण त्याच वेळी देशाच्या सीमांचं आणि हिताचं रक्षण करणं महत्त्वाचं आहे असं भाजपाच्या अपराजिता सरंगी म्हणाल्या.*

*बोगस पासपोर्ट किंवा विजासह आढळून आलेल्या व्यक्तींना ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १० लाखापर्यंत दंड करण्याची तरतूद या विधेयकात आहे. वैध पासपोर्ट किंवा इतर कागदपत्रांशिवाय देशात प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना ५ वर्षांपर्यंत कारावास आणि ५ लाखांचा दंड करण्याची तरतूद यात आहे. हॉटेल, विद्यापीठ, इतर शैक्षणिक संस्था, रुग्णालयांना त्यांच्याकडे येणाऱ्या परदेशी व्यक्तींची माहिती देणं आवश्यक असेल. परदेशी नागरिक वारंवार भेट देत असलेल्या ठिकाणांवर विविध निर्बंध लादण्याचे अधिकार यामुळे केंद्र सरकारला मिळतील. पासपोर्ट कायदा १९२०, परदेशी नागरिक नोंदणी कायदा १९३९, परदेशी नागरिक कायदा १९४६ आणि स्थलांतरित कायदा २००० ची जागा हे विधेयक घेणार आहे.*

**<><><><><>**

उबर आणि ओला या टॅक्सीसेवांच्या धर्तीवर केंद्र सरकार सहकार टॅक्सी सेवा सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित

शहा यांनी केली. लोकसभेत आज चर्चेदरम्यान शहा यांनी ही घोषणा केली आहे.

**होल्ड बाईट - अमित शहा….**

तसंच, सरकार लवकरच एका विमा कंपनीची स्थापना करणार असून ही कंपनी देशातल्या सहकारी व्यवस्थेतले विम्याचे व्यवहार हाताळेल, असंही शहा म्हणाले.

**<><><><><>**

जिंदाल स्टेनलेस स्टील महाराष्ट्रात ४२ हजार ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यामुळे राज्यात १५ हजार ५०० रोजगार निर्माण होणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. मुख्यमंत्री फडनवीस आणि जिंदाल स्टेनलेस स्टीलचे प्रमुख रतन जिंदाल यांची आज बैठक झाली.

**<><><><><>**

मंत्रालयात अभ्यागतांना यापुढे कोणत्याही कामासाठी ‘डिजीप्रवेश’ या ऑनलाईन ॲप आधारित प्रणालीद्वारे मंत्रालयात मिळणार आहे. ‘डिजीप्रवेश’ ॲप डाऊनलोड केल्यानंतर त्यावर सुरूवातीला केवळ एकदाच नोंदणी करावी लागेल. नोंदणी झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारीत यंत्रणेद्वारे छायाचित्राची ओळख पटवून नोंदणी पूर्ण केल्यानंतर, ज्या विभागात काम आहे, त्याचा स्लॉट बुक करून रांगेशिवाय प्रवेश घेता येईल. या संपूर्ण प्रक्रियेला तीन मिनीटांपेक्षा कमी कालावधी लागतो.

अशिक्षीत तसेच स्मार्टफोन नसलेल्या अभ्यागतांसाठी गार्डन गेट इथं ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे प्रवेश नोंदणीसाठी, तसंच मदतीसाठी एक खिडकी उपलब्ध असणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी माधव नेत्रालयाच्या विस्तारित इमारतीच्या भूमिपूजनासाठी ३० मार्च रोजी नागपुरात येत आहेत. त्यावेळी त्यांचं भव्यदिव्य स्वागत करा, अशा सूचना भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या. प्रधानमंत्र्यांच्या स्वागताच्या तयारीसाठी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठक शहरातल्या महाल भागात झाली, तिला बावनकुळे यांनी संबोधित केलं.

**<><><><><>**

देशातल्या प्रसारमाध्यम आणि मनोरंजन क्षेत्राने २०२४मधे सुमारे अडीच हजार अब्ज रुपयांची उलाढाल केली , तर जाहिरातीतून मिळणारा महसूल ८ पूर्णांक १ दशांश टक्क्यांनी वाढला आहे. फिक्की आणि अर्न्स्ट अँड यंग या संस्थांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही माहिती दिली आहे. गेली २० वर्षं अग्रेसर राहीलेल्या दूरचित्रवाहिन्यांवर आघाडी घेऊन डिजिटल माध्यमांनी १७ टक्के वाढ नोंदवत पहिलं स्थान मिळवलं आहे. मुंबईत आज एका कार्यक्रमात हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. माहिती आणि प्रसारण मंत्रालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या वेव्ज उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली.

**<><><><><>**

नांदेड आणि छत्रपती संभाजी नगर मधल्या सरकारी रुग्णालयांमध्ये २०२३ साली मृतांच्या संख्येत झालेली वाढ गंभीर असून  या प्रकरणाचा तपास करण्यासाठी तज्ज्ञाची समिती नेमण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाचं दिले आहेत.  मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती एम.एस.कर्णिक यांच्या खंडपीठानं दिले आहेत.

**<><><><>**

पुण्यातल्या कल्याणीनगर पोर्शे अपघात प्रकरणात दोषी आढळलेल्या दोन निलंबित पोलीस अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याचा प्रस्ताव पुणे पोलिसांनी 'पोलीस महासंचालक' कार्यालयाकडे पाठवला आहे. पोलीस निरीक्षक राहुल जगदाळे, आणि सहाय्यक निरीक्षक विश्वास तोडकरी अशी या दोन अधिकाऱ्यांची नावं आहेत. निलंबनानंतर त्यांची विभागीय चौकशी सुरू होती. त्यात दोघे दोषी आढळले.

या प्रकरणात अल्पवयीन मुलाचे आई-वडिल, ससूनचे दोन डॉक्टर यांच्यासह दहा जणांना अटक केली. तेव्हापासून सर्वजण अद्याप कारागृहात आहेत. त्यांना जामीन मिळालेला नाही.

**<><><><>**

खेलो इंडिया पॅरा गेम्स स्पर्धेचा आज नवी दिल्लीत समारोप झाला. आज शेवटच्या दिवशी झालेल्या खेळांमध्ये टेबिल टेनिसच्या अंतिम फेरीत शशिधर कुलकर्णी, दत्तप्रसाद ज्योतिराम चौगुले आणि विश्वविजय तांबे यांनी विविध श्रेणींमध्ये सुवर्णपदकं जिंकली. तर महिलांच्या गटात देवयानी वाल्हे हिनंही सुवर्णपदक जिंकलं.

या स्पर्धेत महाराष्ट्र ४३ पदकासंह पदकतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. त्यात १८ सुवर्ण, १३ रौप्य आणि १२ कास्य पदकांचा समावेश आहे. पहिल्या स्थानावर हरयाणा असून त्यानंतर तामिळनाडू, उत्तर प्रदेश, राजस्थान यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायजर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होत आहे. हैदराबादमधे थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यात विविध विकासकामं सुरू असून त्या कामांचा दर्जा आणि गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड न करण्याचे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. ते आज कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातल्या प्रमुख विकास प्रकल्पांच्या आढावा बैठकीत बोलत होते.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यात अंमली पदार्थ तस्करांना जरब बसवण्यात येत असून पुढच्या टप्प्यात महसूल विभागाच्या सहाय्याने व्हिडीओ पार्लर आणि कॅसिनोंची तपासणी करावी, अशा सूचना राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज दिल्या. अंमली पदार्थ टास्क फोर्सच्या सहाव्या बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.

**<><><><><>**

महाप्रीत, अर्थात महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा आणि पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित, आणि एनबीसीसी इंडिया लिमिटेड, यांनी मुंबईत सामंजस्य करार केला. मुंबईत ५६ एसआरए प्रकल्प महाप्रित राबवणार आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत मुंबईतल्या गृहसंकुलाची गरज पूर्ण करण्यासाठी महाप्रित आणि एनबीसीसी या कंपन्या सहकार्य करणार आहेत. त्यामुळे गृहसंकुलांना पुनर्विकास करण्याची संधी मिळेल.

**<><><><><>**

कवी नारायण सुर्वे यांच्या ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणाऱ्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या साहित्य संपदेवर आधारित कार्यक्रमाची निर्मिती राज्य सरकारच्या सांस्कृतिक संचालनालयातर्फे केली जाईल, तसंच राज्यभरात कामगार साहित्याचा जागर केला जाईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी आज मुंबईत केली.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ४२ अंश सेल्सिअस, तर सर्वात कमी किमान तापमान गोंदिया इथं १८ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

***//<><><><><>//***